# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 15.09.2017

**प्रेस नोट**

**नवरात्र उत्सवाच्या परवानगीसाठी "एक खिडकी योजना"**

दि.15/09/2017- दिनांक 21/09/2017 पासून ते दिनांक 30/09/2017 पावेतो शहरामध्ये मोठ्या प्रमाणात दुर्गा नवरात्र उत्सव साजरा करण्यात येणार आहे. याकरिता दुर्गा नवरात्र मंडळांना विविध कार्यालयात जाऊन परवानगी आणावी लागते, हा होणारा त्रास ओळखून पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी "एक खिडकी योजना" आज पासून सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी दुर्गा भक्तांना सर्व कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी त्याठिकाणी उपलब्ध असणार आहे त्यामुळे दुर्गा नवरात्र मंडळांना परवानगी मिळणे सोयीस्कर होणार आहे. पोलीस आयुक्तालयात जागा उपलब्ध नसल्याने यावेळेस एक खिडकी योजना हि महानगरपालिका येथे सुरु करण्यात येणार आहे. हि एक खिडकी योजना दि. 14/09/2017 पासून कार्यालयीन वेळेत दुर्गा नवरात्र मंडळांना परवानगीचे अर्ज महानगर पालिकेत स्वीकारण्यात येणार आहेत. या एक खिडकी योजनेचे समन्वय अधिकारी विशेष शाखा पोलीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे असणार आहे व प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक विठ्ठलसिंग राजपूत तसेच सहा.प्रभारी अधिकारी मपोउपनि. रेश्मा सौदागर हे राहणार आहेत. या एक खिडकी योजनेमध्ये महानगरपालिका कार्यालय, धर्मादाय आयुक्त कार्यालय, म.रा.वि.म विभाग 1 व 2 या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपलब्ध असणार आहेत. तसेच पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस स्टेशनचे एक अधिकारी व दोन विशेष शाखेचे कर्मचारी उपलब्ध असणार आहेत. यामुळे सर्व दुर्गा नवरात्र मंडळातील दुर्गा भक्तांनी या एक खिडकी योजनेचा लाभ घेऊन आपल्या दुर्गा नवरात्र मंडळाची रीतसर परवानगी काढण्यात यावी असे आवाहन करण्यात येते.

SD/-

(रामेश्वर थोरात)

सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)

औरंगाबाद शहर